आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

१५ जुलै २०२४ - सोमवार

वारकऱ्यांसाठी स्वतंत्र वारकरी महामंडळाची स्थापना केली असून याचं मुख्यालय पंढरपूर इथंच राहणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पंढरपूरात केली. ते काल पंढरपूरात आषाढी वारीच्या आढावा बैठकीत बोलत होते. यावेळी मंत्री मंडळातले इतर सहकारी आणि अधिकारी उपस्थित होते. पंढरपूर शहराचा  सर्वंकष विकास आराखडा त्वरित सादर करावा, अशा सूचनाही त्यांनी केल्या. विठ्ठल रुक्मिणीच्या दर्शनासाठी व्हीआयपी लोकांपेक्षा वारकरी, शेतकरी आणि कष्टकऱ्यांनाच प्राधान्य राहील, त्याचप्रमाणे प्रत्येक दिंडीसाठी घोषित केलेले २० हजार रुपये त्यांच्या बँक खात्यावर वितरीत झाल्याचंही त्यांनी सांगितलं. पंढरपूर इथं येणाऱ्या वारकऱ्यांना यावर्षी पाणी आणि फळांच्या रसाचं मोफत वाटप करणार आहे.  या ठिकाणी स्वच्छता राहावी, अशी व्यवस्था करण्याचे आदेशही त्यांनी यावेळी दिले. पंढरपूरात नेहमी हजारो नागरिक दर्शनासाठी येतात, त्यामुळे १ हजार बेडच्या नवीन रुग्णालयासाठी स्वतंत्र प्रस्ताव आरोग्य विभागानं तात्काळ सादर करण्याचं आवाहनही त्यांनी यावेळी केलं.

<><><><><>

मराठा आणि ओबीसी आरक्षणावरून राज्यात तयार झालेला तणाव निवळण्यासाठी शरद पवार यांनी पुढाकार घ्यावा, असं आपण त्यांना सांगितल्याचं मंत्री छगन भुजबळ यांनी सांगितलं. शरद पवार यांची त्यांच्या मुंबईतल्या निवासस्थानी भेट घेतल्यानंतर भुजबळ वार्ताहरांशी बोलत होते. भेटीमागे कोणताही राजकीय हेतू नसल्याचंही त्यांनी स्पष्ट केलं. येत्या दोन दिवसांत आपण या विषयावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी चर्चा करू, तसंच राज्यातल्या प्रमुख नेत्यांशी चर्चा करून हा प्रश्न कसा सोडवता येईल ते पाहू, असं पवार यांनी म्हटल्याचं भुजबळ यांनी सांगितलं.

<><><><><>

प्रस्तावित महाराष्ट्र जनसुरक्षा कायद्याच्या आधारे शहरी नक्षलवादाच्या नावाखाली पुरोगामी चळवळींना लक्ष्य करण्याचा सरकारचा उद्देश आहे, अशी टीका राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी समाजमाध्यमावरच्या एका संदेशाद्वारे केली.

हा कायदा ब्रिटिश सरकारनं स्वातंत्र्यपूर्व काळात अंमलात आणलेल्या रैलेट ॲक्टच्या धर्तीवर आधारलेला असल्याचं पाटील यांनी म्हटलं आहे. सध्याचं सरकार कोणालाही न जुमानता केवळ अध्यादेशाद्वारे हा कायदा अंमलात आणण्याचं धाडस करत आहे. या कायद्याद्वारे पोलिसांना अमर्याद अधिकार दिले जाणार असून कोणतेही कारण न दाखवता ते एखाद्या संघटनेला ‘बेकायदेशीर’ म्हणून घोषित करू शकणार असल्याचं पाटील यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

देशात अन्नधान्य, विशेषतः भाज्या आणि उत्पादित वस्तूंच्या किंमतीत झालेल्या वाढीमुळे घाऊक बाजारपेठेतली महागाई वाढून जून महिन्यात ३ पूर्णांक ३६ शतांश टक्क्यांवर गेली आहे. यात सलग चौथ्या महिन्यात वाढ नोंदवण्यात आली. ही महागाई मे महिन्यात २ पूर्णांक ६१ शतांश टक्के इतकी होती.

**<><><><><>**

या आठवड्याच्या पहिल्याच सत्रात आज शेअर बाजारामधे तेजी दिसून येत आहे. आज सकाळी बाजार शुक्रवारच्या तुलनेत १६७ अंकांनी वर उघडला. दुपारपर्यंत बाजार चढे होते. मुंबई शेअर बाजाराच्या निर्देशांकानं एकदा ८० हजार ८६३ अंकांची नवी उंची गाठली होती. तर, राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही २४ हजार ६३५ उंचीवर पोचला होता.

**<><><><><>**

मध्य महाराष्ट्रात उद्यापर्यंत अतिजोरदार पाऊस पडण्याचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. मुंबई शहर, मुंबई उपनगर, पालघर आणि ठाणे या जिल्ह्यासाठी ऑरेंज अलर्ट जारी केला आहे.

कालपासून सुरु असलेल्या पावसामुळे मुंबईत सखल भागात पाणी साचल्यानं वाहतुकीवर परिणाम झाला. तर, कोकण रेल्वे मार्गावर दिवाणखवटी इथं दरड कोसळल्यामुळे कालपासून वाहतूक ठप्प आहे. कुडाळ, कणकवली, वैभववाडी स्थानकावर गाड्या थांबवल्या आहेत. काही गाड्यांमधलं पाणी संपल्यानं प्रवाशांचे हाल झाले आहेत.

दरम्यान, या अडकलेल्या प्रवाशांना घेऊन एसटीच्या बसगाड्या पनवेलच्या दिशेनं रवाना झाल्या आहेत. रत्नागिरीतून ३२, चिपळूणमधून १४, तर खेडमधून १२ गाड्या प्रवाशांना घेऊन मार्गस्थ झाल्या असल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

**<><><><><>**

**रत्नागिरी** जिल्ह्यात गेल्या चार दिवसांपासून मुसळधार पाऊस सुरू आहे. खेड तालुक्यातली जगबुडी नदी सध्या धोका पातळीच्या वरून वाहत असून, राजापूरमधली कोदवली आणि लांज्यातली मुचकुंदी या नद्या इशारा पातळीच्या वरून वाहत आहेत. मात्र, आता पावसाचा जोर ओसरल्याने पाणीपातळीही कमी होऊ लागली आहे. अतिवृष्टीमुळे आज जिल्ह्यातल्या सर्व शाळा, महाविद्यालयांना सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. कालच्या अतिवृष्टीमुळे जिल्ह्यात लांजा आणि राजापूर तालुके वगळता इतर सर्व तालुक्यांमध्ये मिळून सुमारे २ कोटी ६० लाख रुपयांचं नुकसान झालं आहे. ११ गायी-म्हशींचा मृत्यू झाला असून घरं, गोठे, तसंच खासगी आणि सार्वजनिक मालमत्तांचंही नुकसान झालं आहे.

**सिंधुदुर्ग** जिल्ह्यात आज पावसाचा जोर कायम असल्यानं जनजीवन विस्कळीत झालं आहे. दरम्यान, गेल्या रविवारी मागणाववरून पुराच्या पाण्यात वाहून गेलेल्या इसमाचा मृतदेह आज सकाळी कुडाळजवळ नदीत आढळून आला.

//<><><><><>//